आश्वासित करतात मला तिचे विभ्रम.
तिच्या साऱ्याच शंका फिरल्या आहेत,
आशा किंचित आता पालवल्याहेत,
विरघळलेत विश्वासात तिचे संभ्रम

मन विसावून, येते आहे पावलांत बळ.
विस्कटलेल्या दिशा कळू लागल्याहेत,
उजाडल्याने वाटा स्पष्ट दिसताहेत,
उमजलेले आयुष्य नवे, छान आता उजळ.

१७.१.२०१९

---